# BDC LIBRARY

## New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

# रक्तदानासारखे सर्वश्रेष्ठ दान नाही

## रक्तदान शिबिरप्रसंगी संजीव चव्हाण यांचे प्रतिपादन

वार्ताहर

पाटण

विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील बदलाचा आणि प्रगतीचा वेग विस्मयचकित करणारा आहे. विज्ञानाने अवघे मानवी जीवन व्यापून टाकले असले तरी विज्ञानाला अद्याप मानवी रक्त निर्माण करता आलेले नाही. प्रचंड वेगाच्या आणि धकाधकीच्या जीवनात जीवन-मरणाचे प्रसंग नित्याचे झाले असताना रक्ताची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. आजच्या सामाजिक परिस्थितीत समाजऋणातून उतराई होण्यासाठी रक्तदानासारखे अन्य कोणतेही सर्वश्रेष्ठ दान नाही, असे प्रतिपादन येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी केले.

जागतिक युवा दिनानिमित कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये एनएसएस विभाग व रोटरी क्लब पाटण एनसीसी विभाग तसेच आयक्यूएसी विभाग यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. रोटरी क्लबच्या सचिव शीलादेवी पाटणकर, प्रा. बी. एन. पाटील, डॉ. बाबासाहेब सावंत, जयदीप फुटाणे, प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. पवार म्हणाले, महाविद्यालयात दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करून जनजागृती केली जाते. प्रा. डॉ. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक, प्रा. बी. ए. चव्हाण यांनी आभार मानले.